आगच्छत् शिक्षार्थम्। निर्गच्छत् सेवार्थम्।

# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.३६

# लोकसहभागातून शाळेचा विकास व शालेय नेतृत्वाची भूमिका

# School Development through Public Participation and the Role of School Leadership

**प्रस्तावना:**

'शाळा ही समाजाची छोटी प्रतिकृती आहे'; जॉन ड्युई यांचे विचार अधोरेखित करण्याचे कारण म्हणजे शाळेत येणारी मुले ही समाजातील वेगवेगळया कुटुंबातून येतात. समाजाच्या आर्थिक ,सामाजिक, राजकीय व भौगोलिक परिस्थितीचा परिणाम देखील शाळेच्या गुणवत्तेवर होतो. कारण शाळा व समाज हे दोन अविभाज्य घटक आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात लोकसहभाग देखील अत्यंत महत्त्वाचा ठरतो. शिक्षण हक्क अधिनियम {आरटीई} 2009 नुसार शालेय कार्यामध्ये समाजाचा सहभाग घेणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. 16 मे 1996 व 24 ऑगस्ट 2010 च्या परिपत्रकांनुसार पालक सभेच्या माध्यमातून शाळा व समाज यांच्या समन्वयावर भर देण्यात आला आहे. 17 जून 2010 च्या महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत परिपत्रकात देखील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले आहे. शाळेमध्ये लोकसहभाग वाढावा याकरिता स्थानिक पातळीवर शाळा व्यवस्थापन समिती व शाळा व्यवस्थापन विकास समिती स्थापन करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. शाळेची भौतिक सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शाळा व समाज यांचे संबंध दृढ करण्यासाठी लोकसहभाग हा विषय शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे.

**मोड्युल अध्ययनाची उद्दिष्टे :**

1) शालेय नेतृत्वात लोकसहभागाची संकल्पना समजून घेणे.
2) लोकसहभागात येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
3) विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात लोकसहभागाचे महत्त्व समजून घेणे.
4) लोकसहभागात शालेय नेतृत्वाची भूमिका समजून घेणे.
5) विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासात लोकसहभाग मिळविलेल्या यशस्वी नेतृत्वाचा अभ्यास करणे.
6) लोकसहभागासाठी यशस्वीरित्या काम करण्यासाठी शालेय नेतृत्वाचा योग्य दृष्टिकोन विकसित करण्यास मदत करणे.

**लोकसहभाग संकल्पना :**

अगदी प्राचीन काळापासून ते आजच्या काळापर्यंतचा विचार केला तर आपल्या लक्षात येते की, लहान-मोठी विकासाची कामे लोकसहभागातूनच झालेली आहे. लोकसहभागात सांघिक प्रयत्न असतात. एकीची शक्ती व प्रयत्नांची पराकाष्ठा असते. वेळ ,पैसा ,बुद्धी आणि उपलब्ध संसाधनाचा सुरेख संगम असतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 प्रभावीपणे राबविण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. “शिक्षक, प्राध्यापक व शिक्षण क्षेत्रातील इतर घटक यांनी त्यांच्या पातळीवर योगदान द्यावेच त्याचबरोबर समाजातील घटकांनी व खाजगी क्षेत्रांनी देखील शिक्षणामध्ये योगदान द्यावे” असे प्रतिपादन मा. पंतप्रधान मोदी यांनी केले आहे. शिक्षणाचा आणि सरकारी शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील दरी/ विषमता दूर करण्यासाठी लोकसहभागातून शाळेच्या विकासाला पर्याय नाही. शाळेत कोणत्याही कार्याला यशस्वी करायचे असेल तर लोकसहभागाची नितांत आवश्यकता असते. लोकसहभाग जितका उत्तम उन्नत व शाश्वत असेल तितकाच शाळेच्या शैक्षणिक प्रगतीला उपकृत ठरतो.




**लोकसहभागाची काही क्षणचित्रे..**


**लोकसहभागातून शाळेचा विकास व्हावा म्हणून लोकसहभागाची काही उद्दिष्टे खालीलप्रमाणे:**


१) शाळा व समाज संबंध जोपासणे.
२) शाळेची विश्वासार्हता वाढविणे
३) शालेय समस्या सोडविणे.
४) शालेय कार्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे.
५) सहशालेय उपक्रमात समाज सहभाग वाढविणे.
६) समाजातील जेष्ठ व प्रतिभावंत व्यक्तींच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करणे.
७) शालेय विकासासाठी आर्थिक मदत, मनुष्यबळ व भौतिक सामग्री प्राप्त करणे.
८) शालेय वातावरण प्रसन्न, आकर्षित व सुरक्षित करणे.
९) समाजामध्ये परस्पर सहकार्य भावना वाढीस लागणे.
१०) शालेय सामग्रीचे संवर्धन करणे.

**लोकसहभागातून करावयाचे शालेय कार्य :**

लोकसहभागातून शाळेच्या विकासासाठी करावयाच्या कामांचे वर्गीकरण चार विभागात केले जाते.








**लोकसहभागातून शाळेच्या विकासासाठी शालेय नेतृत्वासमोरील आव्हाने :**

बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 नुसार प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आले आहे. त्याबरोबरच शाळेच्या भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता यासाठी


**लोकसहभागातून शाळेचा विकास :**


RTE २००९ नुसार समाजाचा सहभाग घेणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. शाळेच्या विकासासाठी विविध शासकीय योजना राबविल्या जातात. उदा: मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शालेय पोषण आहार इ. या व्यतिरिक्त शाळांच्या भौतिक व शैक्षणिक विकासात लोकसहभागाची संकल्पना पुढे आली. शाळेचा विकास करावयाचा असेल तर लोकांना/ पालकांना शाळेतील विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घ्यावे लागते. शिक्षक व पालक संवाद वाढवावा लागतो. लोकसहभागातून शाळेचे रुपडे बदलण्यासाठी शालेय नेतृत्वापुढे अपेक्षित शैक्षणिक यश प्राप्त होण्यासाठी अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.










**लोकसहभागातून शाळेच्या विकासात शालेय नेतृत्वाचा अभ्यास :**

लोकसहभागातून शाळेचा विकास करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रतिकूल परिस्थितीत आपल्या नेतृत्वाचा यथायोग्य वापर करून मुख्याध्यापक व शिक्षक आपली शाळा यशोशिखरावर घेऊन जाण्यात यशस्वी होताना दिसून येतात. शिरोळ तालुक्याची संपर्क अधिकारी असल्यामुळे या तालुक्यातील शिक्षण परिषदा,शाळा भेटी,वार्षिक तपासणी,विविध कार्यशाळा इत्यादीसाठी संपर्क होतो.समन्वय साधत असताना मला राजर्षि शाहू विद्यामंदिर शिरोळ नं१या शाळाभेटीचा योग आला.शाळेमध्ये पाऊल ठेवताच अत्यंत मनोवेधक व आकर्षक इमारत आपलं लक्ष वेधून घेते.अनेक बाबतीत शाळेचा झालेला विकास चटकन नजरेत भरतो.उत्सुकता म्हणून मी शाळेचे मुख्याध्यापक श्री . भगवान कोळी सर यांना प्रश्न विचारला,"शाळेचे एवढे सगळे वैभव आपण कसे उभे केले?" यावर कोळी सरांनी उत्तर दिले की," केवळ लोकसहभागातून या शाळेचा आम्हाला विकास करता आला." लोकसहभागातून शाळेचा विकास केलेल्या अशा यशस्वी शालेय नेतृत्वाची यशोगाथा आपण अभ्यासणार आहोत. अनेक अडथळे पार करत त्यांनी केलेला प्रवास खरोखरच प्रेरणादायी आहे .आपल्या अपंगत्वावर मात करत शाळेमध्ये अमुलाग्र बदल केले आहेत. यातून प्रेरणा घेऊन आपणही आपले नेतृत्व विकसित करून आपली शाळा प्रगतीपथावर घेऊन जाण्यास कृतीप्रवण व्हाल ही अपेक्षा आहे.

# यशोगाथा



राजर्षि शाहू विद्यामंदिर नं.१ शिरोळ, मुख्याध्यापक व शिक्षक बैठकीतील क्षणचित्रे

**राजर्षि शाहू विद्यामंदिर शिरोळ नं १, तालुका शिरोळ ,जिल्हा कोल्हापूर. १७ वर्ष श्री भगवान शंकर कोळी - मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत.** या शाळेत त्यांची १७ वर्षे सेवा झाली आहे. २००६ रोजी या शाळेचा पट १०० होता. शाळेत रुजू झाल्याबरोबर त्यांच्यासमोर अनेक आव्हाने होती. शाळेची भयानक अवस्था होती. शाळेला कंपाऊंड नव्हते. झाडे, शालेयबाग नव्हती. पिण्याच्या पाण्याची उपलब्धता नव्हती. स्वच्छतागृह नव्हते. क्रीडांगणात दलदलीचे साम्राज्य होते. शाळेवरची कौले फुटलेली होती. खिडक्यांना गज नव्हते. अशा अनेक अपुऱ्या सुविधेसह त्यांनी या शाळेचे नेतृत्व करण्यास सुरुवात केली. सध्या त्यांच्या शाळेची पटसंख्या २५६ आहे .त्याचबरोबर शाळेत येणाऱ्या इयत्ता पहिली ते चौथीच्या सात गावातून येणाऱ्या मुलांची संख्या सुमारे १००आहे ही मुले घालवाड, कनवाड, कुटवाड ,अर्जनवाड, चिंचवड, नंदीवाले वसाहत व आगर या परिसरातून येतात. या शाळेत मुलांना पालक स्वयं स्फूर्तीने घालतात. या सातही गावात प्राथमिक शिक्षणाची सोय असताना देखील राजर्षि शाहू विद्यामंदिर शिरोळ नं १या शाळेत असे काय वेगळेपण आहे ? जे पालकांना पाल्यांसाठी प्रवेश घ्यायला आकर्षित व प्रेरित करते याचे अचूक उत्तर कोळी सर आणि त्यांचे सहकारी यांच्या कार्यात दिसून येते .सर्वप्रथम श्री. कोळी यांनी शाळेतील शिक्षकांची बैठक घेतली. बैठकीत शाळेतील भौतिक सुविधांचा अभाव व शैक्षणिक गुणवत्तेबाबत चर्चा केली. तसेच भौतिक सुविधा लोकसहभागातून कशाप्रकारे प्राप्त करून घेता येऊ शकतील ? शैक्षणिक गुणवत्तेसाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील ? जेणेकरून विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिणाम दिसून येतील याबाबतीत नियोजन केले. याकरिता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कोल्हापूर या संस्थेचे शैक्षणिक मार्गदर्शन देखील घेतले. त्यामुळे भौतिक सुविधा उपलब्ध करून घेताना कोणत्या अडचणी येतात? भौतिक सुविधा उपलब्ध करून घेण्यासाठी कोणती कार्यनीती वापरावी लागेल? शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेसंदर्भात लोकसहभागाची मदत घेता येईल का? शाळेच्या भौतिक विकासासाठी गुणवत्ता विकासासाठी लोकसहभाग कोणकोणत्या प्रकारे मिळवता येईल? याची एक पडताळा सूची केली. सर्वेक्षण केले. शाळेसाठी कोणकोणत्या भौतिक सुविधा उपलब्ध करून घ्यायच्या आहेत? याची यादीच बनवली. गुणवत्ता विकासासाठी अभ्यासक्रम व अभ्यासेत्तर उपक्रमांची यादी बनवली. वेळेनुसार शाळेतील शिक्षकांना पालक भेटी व पालक सभा घेण्याचे स्वातंत्र्य दिले.

सुरुवातीला समाज व पालक यांनी फारसा समाधानकारक प्रतिसाद दिला नाही. मात्र दररोज शाळेतील शिक्षक येतात.सर्व गोष्टींची आपुलकीने चौकशी करतात. शाळेतील मुलांच्या अभ्यासाबाबत चर्चा

खेळीमेळीच्या वातावरणात मुलांशी आंतरक्रिया करतात. त्यामुळे पालकांची भावनिकता जपली जाऊन एक प्रकारची आपुलकी जिव्हाळा आणि स्नेहबंध जोडायला सुरुवात झाली. श्री. कोळी यांनी तर केंद्र, तालुका व जिल्हास्तरावर होणाऱ्या सर्व बैठकात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी लोकसहभागाबाबतचे सर्व शासन निर्णय व परिपत्रकांच्या माध्यमातून माहिती घेतली होती. शाळेचे मुख्याध्यापक श्री. भगवान कोळी यांचा लोकसंपर्क दांडगा आहे. सुसंवादाचे कौशल्य त्यांना उत्तम साधता येते .कोणाचा वाढदिवस असेल, कोणाची सेवानिवृत्ती असेल, कोणाच्या घरी लग्न समारंभ असेल तर कोणाच्या घरी सांत्वना करण्यासाठी जायचे असेल या सर्व प्रसंगात स्वतः उपस्थित राहतात. शिक्षकांना उपस्थित ठेवतात. व्यक्तीच्या भावनिकतेची बाजू उचलून आनंद व दुःखाच्या स्मरणार्थ शैक्षणिक उठाव करणे हा तर त्यांचा हातखंडाच होता .स्वतः मुख्याध्यापक या विषयाबाबत जागृत आहेत ही बाब आदर व विश्वासास पात्र ठरली. श्री कोळी यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांची बैठक घेतली. शाळेतील शिक्षकांचे योगदान घेण्यात ते यशस्वी झाले. शाळेत भौतिक सुविधांची पूर्तता का होत नाही? शाळा लोकसहभाग मिळवण्यात अपयशी ठरते का? शैक्षणिक गुणवत्तेत लोकसभागाचे महत्त्व आहे का? शाळेतील बहुतेक सुविधा व शैक्षणिक गुणवत्तेचा अभाव असणे या सर्व बाबी श्री. कोळी यांच्या पुढील दिशेला मार्गदर्शक ठरल्या. श्री. कोळी यांनी बहुतेक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी उपक्रमांची यादी शिक्षकांच्या मदतीने केली. शाळेतील सर्वच शिक्षकांनी आवर्जून सहभाग नोंदविला. शाळेच्या भौतिक सुविधा व शैक्षणिक गुणवत्तेबाबत श्री. कोळी यांनी खालील बाबींची पूर्तता केली.

**शाळेला मिळालेला लोकसहभाग**

| अ.क्र. | लोकसहभाग वस्तू /देणगी स्वरूपात | अंदाजे किंमत |
|---|---|---|
| 1 | चिल्ड्रन पार्क मधील साहित्य<br>लायन्स क्लब – लोकसहभाग | 9,00,000<br>6,00,000 |
| 2 | प्रोजेक्टर कॉम्प्युटर स्क्रीन बोर्ड | 1,50,000 |
| 3 | प्रोजेक्टर | 40,000 |
| 4 | दोन संगणक | 80,000 |
| 5 | मैदान सपाटीकरण | 2,40,000 |
| 6 | पेविंग ब्लॉक | 5,00,000 |
| 7 | वृक्षारोपण( रोटरी क्लब लायन्स क्लब सर्व मंडळे ) | 1,50,000 |
| 8 | शाळेचे प्रवेशद्वार | 2,50,000 |
| 9 | अभ्यासिका (हॉल) | 3,80,000 |
| 10 | स्थानिक ,राजकीय व भौगोलिक भूगोल साहित्य | 15,000 |

| | | |
|---|---|---|
| 11 | हॅन्डवॉश स्टेशन | 35,000 |
| 12 | पाणी फिल्टर RO सिस्टीम | 40,000 |
| 13 | इतर भेटवस्तू घड्याळ ,सिलिंग, कलर फोटो, पार्टिशन, फरशी, फॅन ,कॉर्नर पीस, शोकेस ,तिजोऱ्या व  खुर्च्या | 1,42,000 |
| 14 | शालेय पोषण आहार धान्य सुरक्षिततेसाठी धान्य कोठ्या | 9000 |
| 15 | वर्ग सजावट :-आरसा, कंगवा, नेलकटर, कचराकुंडी, सिलिंग फॅन, ग्लास बोर्ड, तिजोरी व चप्पल स्टॅन्ड | 93,000 |
| 16 | साऊंड सिस्टिम | 14,000 |
| 17 | झेरॉक्स मशीन | 15,000 |
| 18 | डायस – व्यासपीठ | 5000 |
| 19 | राष्ट्रीय नेत्यांचे फोटो | 4500 |
| 20 | जमखाना (मोठी सतरंजी ) | 6000 |

1) **गुढीपाडवा पट वाढवा :**

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर स्थानिक वर्तमानपत्रात गुढीपाडवा पट वाढवा या उपक्रमांतर्गत जाहिरात वाटली जाते. यात शाळेच्या संपूर्ण उपक्रमांचा आढावा लिखित स्वरूपात पालक व समाजापर्यंत पोहोचवला जातो .शाळेची खास वैशिष्ट्ये देखील नमूद केली जातात. या जाहिरातीच्या माध्यमातून शाळा घरोघरी पोहोचवली जाते. त्यामुळे परिसरातील सात गावातून विद्यार्थी या शाळेकडे आकर्षित होतात.

**पटसंख्या वाढ**

| **अ.क्र.** | **शैक्षणिक वर्ष** | **पटसंख्या** |
|---|---|---|
| 1 | 2017-2018 | 212 |
| 2 | 2018-2019 | 218 |
| 3 | 2019-2020 | 221 |
| 4 | 2020-2021 | 228 |
| 5 | 2021-2022 | 245 |
| 6 | 2022-2023 | 256 |

2) **100% मुलांना गणवेश :**

शासकीय गणवेश योजनेअंतर्गत शाळेतील मागासवर्गीय मुलांना गणवेश मिळतो. मात्र या शाळेत शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेतील मागासवर्गीय व खुल्या संवर्गातील शंभर टक्के विद्यार्थ्यांना गणवेश वाटप केला जातो. यासाठी स्वतः शिक्षक व लोकसहभाग यातून निधी उपलब्ध करतात.

3) **स्पोर्ट्स किट व ओळखपत्र :**

विद्यार्थी सोमवार व शनिवार स्पोर्ट्स किट घालून शाळेत येतात. प्रत्येक शिक्षक व विद्यार्थी यांना शाळेचे ओळखपत्र आहे. विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांना सोमवार व गुरुवार गणवेश केलेला आहे.

**केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धा योगदान**

| अ क्र | शैक्षणिक वर्ष | स्पर्धा प्रकार | क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2016-17 | उंच उडी | प्रथम |
| 2 | 2016-17 | कुस्ती | तृतीय |
| 3 | 2017-18 | कबड्डी | तृतीय |
| 4 | 2017-18 | खो-खो | तृतीय |
| 5 | 2020-21 | धावणे 100 मीटर | द्वितीय |
| 6 | 2022-23 | कबड्डी | द्वितीय |
| 7 | 2022-23 | खो-खो | तृतीय |

4) **चिल्ड्रन पार्क :**

सुमारे 15 लाख रुपये खर्च करून शाळेत लोकसहभागातून चिल्ड्रन पार्क साकारले आहे. यासाठी लायन्स.क्लबकडून नऊ लाख रुपये व लोकसहभागातून सहा लाख रुपये खर्च करण्यात आला. तालुक्यात चिल्ड्रन पार्क असलेली ही एकमेव शाळा आहे. सुरुवातीला 33 × 105 फूट मुरूम काढून त्यात माती भरली, मैदानाचे सपाटीकरण केले आणि खेळाचे साहित्य बसवले यात घसरगुंडी, सी सॉ, बदक ,घोडा, मंकी , डबलबार, सिंगलबार झोपाळे व चक्र आहेत .चिल्ड्रन पार्क मुळे मुलांना मुलांचा शारीरिक विकास होतो , आनंदी वातावरणात मुले खेळाचा आनंद लुटतात.




5) **पालकांसाठी सूचनापेटी :**

शाळेने पालकांसाठी सूचनापेटी ठेवलेली आहे, या सूचनापेटीत शाळेकडून असलेल्या अपेक्षा पालक व्यक्त करतात तसेच पाल्यांच्या अभ्यासविषयक समस्या लिहितात. दर शनिवारी किंवा पालक सभेच्या आदल्या दिवशी सूचनापेटी उघडली जाते, त्यानुसार सूचना व अपेक्षांची पूर्तता शाळेकडून होते.

6) **ई लर्निंग सुविधा :**

शाळेत ई लर्निंग सुविधा आहे. संगणकाचा स्वतंत्र कक्ष आहे. कक्षात तीन संगणक आहेत, एक प्रोजेक्टर ,स्क्रीन बोर्ड , एक स्मार्ट टीव्ही, साऊंड सिस्टिम व झेरॉक्स मशीन असे साहित्य आहे. या कक्षात इयत्ता पहिली ते चौथीसाठी वेळापत्रक तयार केलेले आहे. तासिकेनुसार विद्यार्थी संगणक कक्षात ई लर्निंग सुविधेचा लाभ घेतात. या कक्षात इंग्रजी कंटेंट इयत्तानिहाय दाखवला जातो. गोष्टीचा शनिवार उपक्रम दाखवला जातो. दीक्षा App वरील स्मार्ट कृती दाखवल्या जातात. इयत्ता पहिली ते चौथीच्या पीडीएफ स्वरूपातील अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला जातो.

**विविध स्पर्धा परीक्षेत मुलांचा सहभाग**

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | स्पर्धा परीक्षा प्रकार | इयत्ता | सहभागी विद्यार्थी | उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2021-22 | STS (जिल्हास्तर खाजगी परीक्षा) | 2 री | 10 | 10 |
| 2 | | | 3 री | 20 | 20 |
| 3 | | | 4 थी | 19 | 19 |
| 4 | 2020-21 | STS (जिल्हास्तर खाजगी परीक्षा) | 1 ली | 5 | 5 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 2 री | 8 | 8 |
| 6 | | | 3 री | 9 | 9 |
| 7 | | BDS जिल्हास्तर खाजगी परीक्षा | 2 री | 1 | 1 |
| 8 | 2020-21 | प्रज्ञा शोध परीक्षा | 4 थी | 55 | 48 एक विद्यार्थी तालुक्यात सातव्या क्रमांकावर |
| 9 | 2021-22 | प्रज्ञा शोध परीक्षा | 4 थी | 67 | 60 |
| 10 | 2019-2020 | प्रज्ञाशोध परीक्षा | 4 थी | 64 | 62 |

7) **मैदान सपाटीकरण** :

सुरुवातीच्या काळात मैदानात मुरूम होता. पावसाळयात मैदानात साठलेले पाणी मोटार लावून काढून घ्यावे लागायचे. लोकसहभागातून मैदान सपाटीकरण करण्यासाठी मुरमाचा जास्तीचा भराव टाकला. मैदानाचे सपाटीकरण करून पेविंग ब्लॉक देखील बसवले आहेत.

8) **शाळेचे वृक्षारोपण :**

शाळेच्या प्रांगणात वीस कुंड्यांमध्ये शोभेची रोपे लावलेली आहेत. शाळेत वृक्षारोपण केले जाते. पर्यावरण जाणीव जागृती व पर्यावरण संवर्धनाचे धडे शाळेत गिरविले जातात. गावातील रोटरी क्लब लायन्स क्लब व गावातील सर्व मंडळी यांच्या मदतीने जंगली झाडे, सुबाभळ, गुलमोहर, निलगिरी अशी दिमाखदार झाडे दिसतात. शाळेचे सौंदर्य त्यामुळे अधिकच खुलून दिसते.

9) **भव्य प्रवेशद्वार :**

शाळेच्या आत प्रवेश करताना विद्येच्या प्रांगणात येताना भव्य व देखणे प्रवेशद्वार लक्ष वेधून घेते.

10) **मल्टीपर्पज हॉल :**

शाळेत एक मल्टीपर्पज हॉल आहे. सर्व वर्गांना जोडणारा .घराचे अंगण भासावे असा हा हॉल असून यात शालेय परिपाठ, मेळावे, शालेय पोषण आहार, माता-पालक सभा, केंद्र शिक्षण परिषदा , केंद्रस्तर प्रशिक्षण, सांस्कृतिक कार्यक्रम, विविध स्पर्धा परीक्षांची तयारी इत्यादीसाठी याचा वापर केला जातो. या हॉलमध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जमखाने /सतरंजी वापरली जातात. या हॉलच्या चारही बाजूने कोल्हापूर दर्शन, शिरोळ दर्शनचे डिजिटल बोर्ड केलेले आहेत. यातून विद्यार्थ्यांना जिल्हा व तालुक्याचा इतिहास अधिक ठळकपणे कळतो.

11)**हॅन्ड वॉश स्टेशन :**

साधारण १६ नळांचे हँडवॉश स्टेशन शाळेत आहे. पाण्याचे फिल्टर आहे. पाण्याच्या 2000 लिटरच्या टाकीलाच ROसिस्टीम बसवली आहे. मुलांसाठी स्वच्छ व शुद्ध पाण्याची

व्यवस्था शाळेत आहे. हॅन्डवॉश स्टेशन जवळ मुलांना हात धुण्यासाठी साबण/ लिक्विड सोपची व्यवस्था केली आहे.

**12) सुसज्ज कार्यालय :**

शाळेत सुसज्ज असे कार्यालय आहे. या कार्यालयात विविध समाजसुधारक राष्ट्रीय नेते यांचे फोटो लावलेले आहेत. घड्याळ, फॅन, कॉर्नर पीस शोकेस तिजोऱ्या बाकी खुर्च्या इत्यादींची व्यवस्था केली आहे त्यातच एक पार्टिशन केलेले असून शिक्षक कक्ष तयार केलेला आहे ऑफिसला रूफ सिलिंग केलेले आहे.

**13) वर्ग सजावट :**

प्रत्येक वर्गाची  सजावट सुंदर आहे. प्रत्येक वर्गात आरसा, कंगवा ,नेलकटर ,डस्टबिन, सिलिंग फॅन,ग्लास बोर्ड ,तिजोरी आहे. प्रत्येक वर्गाच्या बाहेर चप्पल स्टॅन्ड ठेवलेले आहे. वर्गात तरंग वाचनालय आहे. प्रत्येक वर्गात छोटेसे ग्रंथालय देखील आहे. वर्गात बोलक्या भिंती आहेत.

**14) धान्य सुरक्षेसाठी धान्य कोठ्या :**

पूर्वी धान्याचे नुकसान फार होत असे. शालेय पोषण आहारासाठी शासनाकडून मिळालेले धान्य सुरक्षित रहावे यासाठी शाळेत तब्बल ११ धान्य कोठ्या आहे. यात काही शासकीय योजनेतून मिळालेल्या तर काही लोकसहभागातून मिळवलेल्या आहेत. या स्टोअर रूममध्ये सध्या बाराशे, शंभर, पन्नास किलोच्या या कोठ्यांमध्ये डाळ, तांदूळ विविध प्रकारची कडधान्य असा पूरक आहार साठविला जातो.

**15) मल्टीपर्पज वजन काटा :**

धान्य मोजणे व विद्यार्थ्यांचे वजन करणे यासाठी शाळेत मल्टीपर्पज वजन काटा उपलब्ध आहे.

**16) माता पालकांसाठी स्पर्धा :**




बालिका दिन व महिला दिनाचे औचित्य साधून पूरक व पौष्टिक आहाराचे महत्त्व डोळयासमोर ठेवून शाळा विविध खाद्य पदार्थ बनविण्याच्या स्पर्धांच्या आयोजन करते, प्रदर्शनात पदार्थ मांडणी करून स्टॉल लावले जातात पसंती क्रमांक देखील काढले जातात.

**शाळेतील अन्य गुणवत्तापूर्ण कार्यक्रमांचा अहवाल खालील प्रमाणे आहे :**

**केंद्र स्तरावरील सांस्कृतिक स्पर्धा आयोजनात शाळेचा सहभाग**

| अ.क्र | शैक्षणिक वर्ष | स्पर्धा प्रकार | क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2022-23 | समूहगीत<br>समूहनृत्य<br>प्रश्नमंजुषा | द्वितीय<br>प्रथम<br>तृतीय |
| 2 | 2018-19 | समूहगीत<br>समूहनृत्य | प्रथम<br>द्वितीय |
| 3 | 2015-16 | समूहगीत | द्वितीय |
| 4 | 2014-15 | समूहगीत | प्रथम |
| 5 | 2022-23 | समूह नृत्य | प्रथम |

1) शाळेत मुलांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा म्हणून विविध स्पर्धांच्या आयोजनावर भर दिला जातो.

2) इयत्ता चौथीसाठी प्रज्ञाशोध परीक्षा घेतली जाते एकूण 56 विद्यार्थी या परीक्षेला सामोरे गेले त्यात गुणवत्ता यादीत एकूण आठ विद्यार्थी झळकले व एका विद्यार्थ्याने तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला आहे.

3) इयत्ता तिसरीच्या मुलांसाठी बीडीएस परीक्षा घेतली जाते.

4) इयत्ता पहिली ते चौथीसाठी समृद्धी, ऋणानुबंध, शताब्दी या परीक्षेसाठी मुलांची तयारी करून घेतली जाते.

5) बाहेरून क्रीडा शिक्षक बोलवून कुस्ती स्केटिंग व कराटे यांचे मार्गदर्शन देखील दिले जाते.

6) अध्ययन कक्षात मुलांसाठी वाचन लेखन वर्ग घेतले जातात.

7) एम पी एस पी मार्फत प्राप्त प्रगत भाषा व गणित विषय समृद्धीकरण शैक्षणिक साहित्य संचाचा वापर केला जातो.

8) शाळेत भाषा ,गणित आणि इंग्रजी पेटीचा वापर केला जातो.

9) थोर नेत्यांच्या जयंती पुण्यतिथी विविध स्पर्धा (निबंध भाषण चित्रकला गीत गायन प्रश्नमंजुषा रांगोळी) मधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविला जातो.

10) शाळेत सर्व शासकीय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी केली जाते.








**राजर्षि शाहू विद्यामंदिर नं. १ शिरोळ शाळेतील काही उपक्रमांची क्षणचित्रे**

## विविध प्राप्त पुरस्कार

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | प्रमाणपत्र /शिल्ड |
|---|---|---|
| 1 | राजर्षी शाहू सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता विकास कार्यक्रम उत्कृष्ट शाळा प्रथम क्रमांक | प्रमाणपत्र |
| 2 | आदर्श शाळा पुरस्कार श्री साई समर्थ फाउंडेशन जयसिंगपूर | शील्ड व प्रमाणपत्र |
| 3 | आय एस ओ मानांकन प्राप्त शाळा | प्रमाणपत्र |
| 4 | उत्कृष्ट पटनोंदणी पंचायत समिती शिरूर | प्रमाणपत्र |
| 5 | माझी समृद्ध शाळा विशेष योगदान जे पी नाईक जन्मशताब्दी वर्ष पंचायत समिती शिरोळ | प्रमाणपत्र |
| 6 | स्वच्छ सुंदर हिरवी शाळा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड कोल्हापूर | शील्ड व प्रमाणपत्र |
| 7 | उत्कृष्ट पटनोंदणी पुरस्कार पंचायत समिती शिरोळ | प्रमाणपत्र |

राजर्षि शाहू विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांचे बहुतांशी पालक शेती,शेतमजुरी, सेंट्रींग , मोलमजुरी रोजंदारी असे छोटे छोटे व्यवसाय व मिळेल ते काम करतात. अशा भागात आपल्या शाळेचे अस्तित्व टिकवण्यासाठी व लोकसहभागातून शैक्षणिक गुणवत्ता व मुलांचा सर्वांगीण विकास यासाठी श्री. भगवान कोळी कटिबद्ध आहेत. अत्यंत प्रामाणिकपणे शाळेत उपक्रम राबविणे व शिक्षक वृंदांच्या मदतीने सतत कार्य करत राहणे यासाठी ते तत्पर असतात. शिरोळ तालुक्यात शाळेचा आदर्शवत नावलौकिक आहे. श्री. कोळी यांच्या कार्य कर्तृत्वातून शाळेला मोठ्या प्रमाणात भौतिक सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक गुणवत्तेमध्ये शाळा आघाडीवर आहे. लोकसहभागातून शाळेच्या विकासात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. शाळेसाठी अविरतपणे काम करून त्यांनी शालेय नेतृत्व सिद्ध केले असून त्यांचे कार्य निश्चितच प्रेरणादायी आहे .

**लोकसहभागातून मुलांमध्ये झालेले बदल :**

1) बहुतेक सुविधा व शैक्षणिक गुणवत्ता असल्याने शाळेत मुलांच्या शंभर टक्के पटनोंदणीचे प्रमाण वाढले.
2) विद्यार्थ्यांचे उपस्थितीचे प्रमाण वाढले.
3) विद्यार्थी क्रीडा स्पर्धा बौद्धिक स्पर्धा इत्यादी उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊ लागले .
4) विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त दिसून आली .
5) विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढला .
6) शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व मुलांना मोफत पाठ्यपुस्तके दोन वह्या व गणवेशाचे वाटप होत असल्याने मुलांमध्ये शाळेविषयी आकर्षण वाढले.
7) शाळेत उत्तम शालेय पोषण आहार दिला जातो त्यामुळे विद्यार्थी उपस्थितीत सुधारणा झाली.
8) शाळेत प्रत्येक मुलाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते.
9) मुलांना बचत बँकेमुळे बालपणापासूनच बचतीची सवय लागली.
10) विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याचे दिसून आले.

तालुका संपर्क अधिकारी म्हणून शाळेत शाळा भेटीची जबाबदारी माझ्याकडे आली. या दरम्यान शाळांना भेटी देणे , प्रशिक्षण, शिक्षण परिषद, बैठका घेणे, मुख्याध्यापक ,शिक्षक व विद्यार्थ्यांचे सुसंवाद साधणे या गोष्टी करता आल्या. तालुक्यातील प्रयत्नातून प्रगतीकडे जाणारी शैक्षणिक गुणवत्ता विकासामध्ये तालुक्यातील प्रथम क्रमांकाची शाळा कशा पद्धतीने लोकसहभागातून गुणवत्ता विकास साधते हे अभ्यासण्यात नितांत समाधान व आनंद वाटला .

**चला तर... चिंतनात्मक प्रश्नावर थोडा विचार करूया....**

1) श्री. कोळी यांनी शाळेत घडवून आणलेल्या बदलांची यादी करा.

2) लोकसहभागातून शाळेचा विकास साधताना कोणत्या नेतृत्व कौशल्याची गरज आहे असे आपणास वाटते.

**थोडासा विचार थोडीशी चर्चा करूया....**

लोकसहभाग घेण्याबाबत कमालीची अनास्था दिसून येते त्यामुळे शाळेच्या गुणवत्ता विकास करताना अडचणी येतात अशा शाळेच्या ठिकाणी बदलीने रुजू झाल्यास आपण काय कराल?

**लोकसहभागातून शाळेच्या विकासासंदर्भात असेही करता येईल :**

1) शाळेच्या विकासासाठी देणगी दिलेल्या देणगीदारांची नोंद शाळेत ठळकपणे करता येईल.

2) लोकसहभागातून मिळालेल्या सुविधा व शासनाकडून प्राप्त झालेल्या सुविधा असे वर्गीकरण करता येईल.

3) दर तीन महिन्यांनी होणाऱ्या शाळा व्यवस्थापन समिती स लोकसहभागाबाबत अवगत करता येईल.

4) लोकसहभाग मिळावा म्हणून मुख्याध्यापक व शाळेतील शिक्षक यांच्या पालक भेटी व गृहभेटीचे आयोजन करता येईल.

5) लोकसहभाग वाढविण्यासाठी मुख्याध्यापक बैठक, शिक्षक बैठक, इयत्ता निहाय पालक बैठक घेता येईल. पालक शाळेत आवर्जून उपस्थित राहतील अशा कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

6) लोकसहभागातून शाळेचा विकास करण्याबाबत शाळेतील मुख्याध्यापक ,शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती ग्रामस्थ आणि पालक यांच्याशी संवाद साधता येईल.

7) सक्रिय सहभागी झालेल्या ग्रामस्थांचा जाहीर सत्कार करता येईल.

8) शाळा व समाज यांच्यात सहकार्याचे संबंध प्रस्थापित करता येईल यांच्यातील समन्वयाची प्रेरणा घेता येईल.

**लोकसहभागासंदर्भात शासन निर्णय/ परिपत्रके :**

1) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 नुसार बालकांच्या गुणवत्ता पूर्ण शिक्षणाकडे लक्ष वेधले आहे.

2) दिनांक 17 जून 2010 रोजी च्या शासन निर्णयानुसार शाळा व्यवस्थापन समितीच्या स्थापनेबाबत सूचना दिल्या आहेत.

3) दिनांक 16 मे 1996 च्या परिपत्रकानुसार शाळा व समाज यांच्या समन्वया बाबत सूचना.

4) दिनांक 24 ऑगस्ट 2010 च्या परिपत्रकांवर पालक सभेच्या माध्यमातून शाळेच्या विकासाकडे लक्ष वेधले आहे.

5) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार लोकसहभागाबाबत चिंतन करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

शाळेच्या विकासासाठी लोकसहभाग मिळावा म्हणून वरील शासन निर्णय, परिपत्रके यांची मदत झाली आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने लोकसहभाग संदर्भात केलेला विचार :**

NEP 2020 च्या तत्वात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील सर्वांगीण विकासात चालना देण्यासाठी शिक्षक तसेच पालकांना संवेदनशील बनवून प्रत्येक विद्यार्थ्यांची अद्वितीय क्षमता ओळखणे शोधणे व वृद्धिंगत करणे.

- एक बळकट आणि चैतन्यमय सार्वजनिक शिक्षण प्रणाली मध्ये भरीव गुंतवणूक आणि त्याचबरोबर खऱ्या अर्थाने परोपकारी वैयक्तिक आणि लोकसहभागास प्रोत्साहन देणे आणि सुविधा उपलब्ध करून घेणे.
- जेव्हा मुले कुपोषित किंवा आजारी असतात तेव्हा ते चांगल्या प्रकारे शिक्षण घेण्यास असमर्थ असतात पौष्टिक आहारासोबतच सुशिक्षित सामाजिक कार्यकर्ते समुपदेशक आणि शालेय शिक्षणामध्ये समाजाचा सहभाग याद्वारे विद्यार्थ्यांचे पोषण आणि आरोग्य (मानसिक आरोग्यासह) यावर लक्ष दिले जाईल.
- वय वर्ष तीन ते अठरा पर्यंतच्या सर्व मुलांसाठी समान व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी योग्य सुलभन निर्माण करण्यात येईल. शाळा, शाळेचा परिसर यांच्याशी जोडलेले समुपदेशक प्रशिक्षित समाजसेवक आणि शिक्षक हे नेहमी विद्यार्थी आणि पालक यांच्यासोबत काम करतील.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये NEP 2020 निर्देशित केलेल्या शिफारशी**

- पालक आणि इतर मुख्य संबंधित घटक यांच्या सहयोगाने शिक्षक हे शाळा व्यवस्थापन समिती शाळा समूह ,शाळा व्यवस्थापन विकास समिती सदस्य या भूमिकेतून  शाळा समूह यांच्या कारभारात सक्रिय सहभाग नोंदवतील अशी शिफारस आहे.
- NEP2020 मध्ये सामाजिक सहभाग हा लोकहितैषी खाजगी आणि सामाजिक सहभागासाठी प्रोत्साहन देणारा आणि सुलभता आणणारा असावा अशी शिफारस आहे.
- NEP 2020 मध्ये शाळा बांधणे संदर्भात सरकार आणि अशासकीय लोकहितैषी संस्थांना प्रोत्साहित करण्याची शिफारस आहे.
- शालेय पायाभूत सुविधा आणि संसाधने या संदर्भात शाळांत उपयोगात न येणारे संसाधने सामाजिक चेतना केंद्र म्हणून वापरण्यावर भर दिला आहे.
- लोकविद्याअंतर्गत स्थानिक कलाकारांना शाळेमध्ये प्रमुख निदेशक म्हणून संधी देण्यात आली आहे.

**लोकसहभागातून  शाळेचा विकास व शालेय नेतृत्वाची भूमिका या मोड्युलची शालेय नेतृत्वाच्या दृष्टिकोनातून भूमिका :**

RTE 2009 नुसार बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार प्राप्त झाला. शाळेत येणारे प्रत्येक मूल शिकले पाहिजे व त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे या हेतूने शासकीय योजना बरोबरच लोकसहभागातून शाळेच्या विकासाकडे लक्ष देणे आवश्यक ठरले. यासाठी गाव, तालुका ,जिल्हा व राज्यस्तरावर विविध शासकीय संस्थांची माहिती घेणे, संस्थाकडे शाळा विकासासाठी प्रस्ताव देऊन पाठपुरावा करणे, शिक्षकांना त्यांची भूमिका समजावून देणे, गावातील मंडळींना शाळा विकासाची जाणीव करून देणे, शाळेत पालक सभा घेणे, विविध शालेय उपक्रमात पालकांचा सहभाग वाढविणे, शिक्षकांना गृहभेटी व पालक भेटी संदर्भात प्रोत्साहन देणे, शाळेसाठी काम करणाऱ्या सर्व पर्यवेक्षीय यंत्रणेला प्रेरणा देणे, शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे, या सर्व अभ्यासातूनच सदर मोड्युलची निर्मिती झाली ज्याचा फायदा नक्कीच नेतृत्व विकासाच्या वाटचालीस होईल.

**समारोपः**

शिक्षण क्षेत्रात काम करताना अनेक विपरीत व प्रतिकूल परिस्थितीतून नेतृत्वाला मार्ग काढावा लागतो. शाळेच्या विकासासाठी केवळ शासकीय योजनेवर अवलंबून न राहता गावातील मंडळी व पालक यांच्या संपर्कात राहून काम करण्याचे सामर्थ्य सक्षम नेतृत्वाकडे असते .शाळेचा नेता म्हणून काम करत असताना शालेय नेतृत्व विकसित होत असते. यात नियोजन, व्यवस्थापन व प्रशासन तसेच स्वयंविकास अन्य शालेय घटकांचा विकास भागीदारी संघ बांधणे यातील भूमिका व जबाबदारी यांचा समावेश होतो .नेता हा शाळेला प्रगतीपथावर नेण्यासाठी शाळेला भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे व शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे यासाठी लोकसभागातून शैक्षणिक उठाव करणे यासाठी आपल्या सहकाऱ्यांना प्रेरणा देतो. आपल्या कार्यक्षेत्रात स्वतःच्या उदाहरणातून शालेय नेतृत्वाचा आदर्श निर्माण करतो. कोल्हापूर जिल्ह्यातील नगरपरिषद भागातील शाळेत लोकसहभागातून प्रचंड मोठा शैक्षणिक उठाव करणारे श्री. भगवान कोळी यांच्यासारखे अनेक मुख्याध्यापक व शिक्षक कोल्हापूर जिल्ह्यात आहेत. या सर्वांच्या अभ्यासातून शाळेच्या विकासासाठी भरीव यशस्वी कार्य होत राहो हीच मनस्वी सदिच्छा!

**संदर्भ साहित्य :**


1) परिपत्रक 1996 शाळा व समाज समन्वयाबाबत संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

2) शासन निर्णय 2010 शाळा व्यवस्थापन समिती स्थापना महाराष्ट्र शासन.

3) परिपत्रक 2010 पालक सभांचे आयोजन करणे बाबत संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

4) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 आरटीई.

5) शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम पूरक वाचन साहित्य जानेवारी 2018 संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

6) निष्ठा मुख्याध्यापक आणि शिक्षक यांच्या समग्र प्रगतीसाठी राष्ट्रीय पुढाकार डिसेंबर 2019 संचालक राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र पुणे.

7) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मानव संसाधन विकास मंत्रालय शिक्षण मंत्रालय.

8) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 सारांश.

9) महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मीपा) औरंगाबाद स्तरावरील मोड्युल.

10) राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था निफा नवी दिल्ली स्तरावरील मोड्युल.


**You tube link**

1) https://youtube.com/@tejaswinipatil7068
2) https://youtube.com/watch?v=98oTIVfeh-8&feature=share
3) https://youtube.com/watch?v=rQF2DFEAJCA&feature=share


| मोड्यूल विकसक | समन्वयन | मार्गदर्शक |
|---|---|---|
| डॉ.अंजली सतीश रसाळ | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| वरिष्ठ अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व |
| कोल्हापूर | प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |